विषय : कोविड-१९ विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी
प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या अनुषंगाने
पारीत केलेले आदेश, निर्देश, SOP इत्यादींचे
प्रभावी अंमलबजावणी बाबत...

जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
जा.क्र.२०२१/मशाका/आ.व्य./कावि -
दि. १७/०२/२०२१

वाचा:- १) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/ आरोग्य-५ दि.१५.०३.२०२०.
२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे कलम २,३व ४
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२०.
४) महाराष्ट्र शासन, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन विभाग, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई – ३२ यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक २९ जानेवारी २०२१.
५) मा. जिल्हाधिकारी यांचे आदेश जा.क्र. २०२०/आरबी-१/डेस्क २/टे-४/CRPC- १४४/प्र.क्र.-१३ दिनांक २९ जानेवारी २०२१.

**परिपत्रक :-**

कोविड-१९ विषयी मा. मुख्यमंत्री आणि मा. उपमुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १६ फेब्रुवारी २०२१ रोजी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्यासमवेत झालेल्या व्हिडिओ कॉन्फरन्सच्या अनुषंगाने खालील प्रमाणे तात्काळ कार्यवाही करावी.

१) महानगरपालिका आयुक्त, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, मुख्याधिकारी न.प. यांनी त्यांच्या अधिकारक्षेत्रातील सर्व मंगल कार्यालये, कोचिंग क्लासेस, खाजगी शाळा. अनुदानित व विनाअनुदानित शाळा/विद्यालय/महाविद्यालय, बँक्वेट हॉल, हॉटेल्स, रेस्टॉरेंट, नाट्यगृहे, चित्रपट गृहे, व्यायामशाळा, शॉपिंग मॉल्स, धार्मिक स्थळे, उद्याने, व इतर गर्दी होणारी स्थळे या ठिकाणी वेळोवेळी अचानक भेट देऊन तपासणी करावी. सदर ठिकाणी प्रमाणित कार्यप्रणाली (SOP) मधील मर्यादेपेक्षा जास्त संख्येत लोक उपस्थित असतील, उपस्थित लोकांनी मास्क लावलेले नसेल, हँड सॅनीटायझरची उचित व्यवस्था नसेल, त्यांना प्रथम वेळी नोटीस देऊन उचित दंड आकारावा. नोटीस देताना पुढील तपासणीत हीच परिस्थिती राहिली तर गुन्हा दाखल करण्यात येईल असा स्पष्ट उल्लेख नोटीस मध्ये करावा. त्याच ठिकाणी दुसऱ्या वेळेस जर अशीच परिस्थिती राहिली तर संबंधित प्रतिष्ठानांवर गुन्हा दाखल करावा अथवा सदर प्रतिष्ठान १५ दिवसांकरिता सील करण्याची कार्यवाही करावी. तसेच सार्वजनिक ठिकाणी मास्क न लावणाऱ्यांवर रु.५००/- एवढा दंड आकारावा. त्याचप्रमाणे कुठले CCC सेंटर बंद आहेत व कुठले CCC सेंटर चालू करावे लागणार आहेत यासंबंधीची पूर्वतयारी करावी कोरोनाचा संसर्ग वाढत असेल त्या भागात किंवा परिसरात टार्गेटेड पद्धतीने तपासण्या कराव्यात, एकेक रुग्णांचे किमान २० तरी संपर्क शोधलेच पाहिजेत. ज्या भागात कोरोनाचा रुग्ण सापडला असेल त्या ठिका निदान मायक्रो सिलिंग तरी करावे. पेशंटच्या घरातील सर्वांची कोविड तपासणी करावी. भाजी मंडई, दुकान अशा लोकांच्या ठराविक अंतराने नियमित कोरोना चाचण्या कराव्यात. सर्व राजकीय पक्षाना राजकीय कार्य घेताना शासनाने ठरवून दिलेल्या SOP प्रमाणेच कार्यवाही करणे बंधनकारक असेल.

२) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प. नांदेड, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, म.न.पा. नांदेड. यांनी अध्यक्ष, इंडियन मेडिकल असोसिएशन यांचे समवेत सर्व खाजगी प्रॅक्टिस करणाऱ्या डॉक्टरांची बैठक आयोजित करावी. सदर बैठकीत ज्या रुग्णांना सर्दी, ताप, खोकला अशी लक्षणे असतील व त्यांना असे वाटत असेल की रुग्णाला कोविड-१९ रोगाची प्राथमिक लक्षणे दिसत असतील तर त्यांनी अशा रुग्णांना ताबडतोब कोविड-१९ ची टेस्ट करून घेण्यासंबंधीच्या सूचना द्याव्यात. तसेच जिल्ह्यात उपलब्ध असेलेले सर्व व्हेंटीलेटर्स चालू आहेत किंवा कसे याची खात्री करून घ्यावी. सार्वजनिक ठिकाणी मास्कचा वापर करणे, सामाजिक अंतर ठेवणे, ठराविक अंतराने हाथ साबणाने स्वच्छ धुणे याविषयी व्यापक प्रमाणात जनजागृती करावी.

३) सर्व इन्सिडेंट कमांडर यांनी त्यांचे अधिनस्त असलेल्या CCC सेंटर मधील कोविड-१९ च्या अनुषंगाने उपलब्ध झालेली साधनसामुग्री सुस्थितीत असल्याची खात्री करावी व उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

(डॉ. विपिन इटनकर भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर**

१) मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलिपी, माहितीस्तव व कार्यवाहीस्तव**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड.
२) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
३) पोलीस अधीक्षक, नांदेड.
४) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
५) अधिष्ठाता, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपुरी, नांदेड.
६) अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड.
७) जिल्हा शल्यचिकित्सक, नांदेड.
८) जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. नांदेड.
९) सर्व तालुका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा.
१०) वैद्यकीय आरोग्य अधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
११) सर्व मुख्याधिकारी न.प., नांदेड जिल्हा.

स्वाक्षरीत/-
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड.